# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनीक्र. : ८१९ २८२८.


## ।। सामान्य प्रशासन विभाग।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./२४६/२०२० - २१  दि. १० /०३/२०२१

## //परिपत्रक//

विषय :- शब-ए-मेराज व शब-ए-बारात- 2021 मार्गदर्शन सूचना

मिरा भाईंदर परिक्षेत्रात कोविड-19 च्या अनुषंगाने यावर्षी सर्व धर्मीय सण, उत्सव तसेच सर्व कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात येत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव अद्यापही कमी झालेला नसून सध्या राज्यात तसेच मोठया शहरांमध्ये रुग्णांच्या संख्येत पुन्हा वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करता या वर्षी शब-ए-मेराज व शब-ए-बारात उत्सव अत्यंत साधेपणाने साजरा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत :-

1. शब-ए-मेराज व शब-ए-बारात निमित्त सर्व मुस्लीम धर्मीय बांधव आपआपल्या विभागातील मशिदीत रात्रभर नमाज, कुराण व दुवा पठण करतात. त्यामुळे बहुसंख्य मुस्लीम वस्तीत रात्रभर मुस्लीम बांधवांची वर्दळ असते. तसेच काही ठिकाणी वाझ या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. कोविड-19 च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता यावर्षी दि. 11 मार्च रोजीची रात्र व दि.12 मार्च, 2021 ची पहाट या कालावधीत शब-ए-मेराज (चंद्रदर्शनावर अवलंबून) व दि.28 मार्च रोजीची रात्र व दि.29 मार्च, 2021 ची पहाट या कालावधीत (चंद्रदर्शनावर अवलंबून) येणाऱ्या शब-ए-बारात या उत्सवानिमित्त कोणत्याही प्रकारे मिरवणुकांचे आयोजन न करता मशिदीत अथवा घरातच दुवा पठाण करणे उचित ठरेल. त्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी जनजागृती करण्यात यावी.
2. शब-ए-मेराज व शब-ए-बारात निमित्त स्थानिक मशिदीत नमाज पठणाकरीता येणाऱ्या मुस्लीम बांधवांनी कोणत्याही प्रकारची गर्दी न करता एका वेळी 40 ते 50 व्यक्तींनी टप्प्या- टप्प्याने सोशल डिस्टन्सींगच्या नियमांचे पालन व मास्कचा वापर करुन दुवा पठण करावे.
3. मशिदीतील व्यवस्थापक यांनी मशिद व आजूबाजूच्या परिसरात निर्जंतुकीकरणाची व्यवस्था, सोशल डिस्टन्सिंग व स्वच्छतेचे नियम (मास्क , सॅनिटायझर, इ.) चे पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे.

4. शब-ए-मेराज व शब-ए-बारात दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या वाझ कार्यक्रमाचे आयोजन शक्यतो बंदीस्त जागेत करावे. परंतू खुल्या जागेत आयोजन केल्यास कोणत्याही प्रकारची गर्दी होणार नाही व त्या ठिकाणी सोशल डिस्टन्सींगच्या नियमांचे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.
5. कोविड-19 अनुषंगाने मुंबईमध्ये लागू असलेल्या फौ.दं.प्र.सं. कलम 144 अन्वये जारी केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे.
6. शब-ए-मेराज व शब-ए-बारात च्या अनुषंगाने वाझ कार्यक्रमाचे आयोजक यांनी कार्यक्रमाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादी द्वारे उपलब्ध करून द्यावी.
7. कोविड-19 च्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका, पोलीस प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

1. मा.महापौर
2. मा.आयुक्त, मिरा भाईंदर वसई-विरार, पोलीस आयुक्तालय
3. मा.उपमहापौर
4. मा.सभापती
5. मा.सभागृह नेता
6. मा.विरोधी पक्ष नेता
7. मा. सभापती, परिवहन
8. मा.सभापती, महिला व बालकल्याण
9. मा.गटनेते/गटनेत्या
10. मा. सभापती प्रभाग समिती क्र. 1 ते 6
11. मा.पोलीस निरिक्षिक, मिरा भाईंदर वसई-विरार, पोलीस आयुक्तालय
12. मा.नगरसेवक/नगरसेविका
13. अति.आयुक्त
14. उपायुक्त (सर्व)
15. जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग